नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.३०८**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ११ याची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - कैलास शंकर धाडे

वय - ६१ वर्षे, व्यवसाय – शेती,

रा. - म्हैसवाडी, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....**

०१. माझी शेती चिंचोड शिवारात आहे. त्याचा गट क्र. ७५, ७९ आहे. सन २०२२-२३ मध्ये मी कपासी पेरली होती. ती १३ क्वींटल ३५ किलो झाली होती. तो माल मी आरोपी क्र. १ जगन नारखेडे याच्या दलालाला विकला होता. त्याचे नाव रमेश भागवत लाहुडकर होते. त्याची व माझी शेती चिंचोड शिवारात असल्यामुळे मी त्याला ओळखतो. त्यावेळी ९ हजार प्रति क्वींटल भाव ठरला होता. तो माल रमेश भागवत लाहुडकरने जुलै २०२३ साली नेला होता. तो माल त्याने ट्रक्ने नेला होता. त्याचे १ लाख काहीतरी रूपये झाले होते. निश्चीत रक्कम सांगता येत नाही. तो व्यवहार एका महिन्याचा ठरला होता. मला फक्त १३ हजार रूपये मिळाले. उर्वरित पैसे मला मिळाले नाही. त्यामुळे मी पोलीसात तक्रार दिली. रमेश भागवत लाहुडकरने माझ्याशिवाय महादेव शामराव धाडे याचा देखील माल नेला होता. पोलीस स्टेशन मधून मला बोलावण्यात आले होते. मी तेथे गेलो होतो. त्यांनी तक्रार घेतली. मी पोलीसांना ७/१२ उतारा दिला होता. आता मला दोन ७/१२ उतारे दाखविण्यात आले. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र.३०९ व ३१०** देण्यात आले. मी आरोपी रमेश भागवत लाहुडकर याला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु....**

०२. हे म्हणणे खरे आहे की, कापसाचा संपूर्ण व्यवहार हा रमेश भागवत लाहुडकर यांच्यासोबत झाला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ जगन याच्याशी माझा कधीही संबंध आला नाही. मी आरोपी क्र. १ ला कधी पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कापसाचा माल जगन नारखेडेचे दलाल रमेश लाहुडकर यांना दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, जगन नारखेडे व रमेश लाहुडकर यांचा एकमेकांशी कोणताही संबंध

नाही. हे म्हणणे खरे नाही की, रमेशरला कापसाचा माल दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील संपूर्ण मजकुर खोटा सांगत आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०३. सदर प्रकरणातील आरोपी रमेश लाहुडकर याला सोडून मी इतर आरोपींना ओळखत नाही व त्यांच्याशी काही संबंधही नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०४. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०५. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला..

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०६. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....</u>**

०७. ट्रक कोणाच्या मालकीचा होता व त्याचा क्रमांक काय होता हे मला माहीत नाही. तथाकथीत व्यवहार किती रक्कमेचा होता हे मी निश्चीतपणे सांगू शकत नाही. १३ कवींटल ३५ किलो कापसाचे किती तोल भरले होते हे मला आठवत नाही. तो कापूस मोजायला कोण मापारी होता हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कापूस मोजतेवेळी त्याचे छोटे छोटे तोल करतात व त्यानंतर त्याचे एकत्रीत अंतिम वजन ठवण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक तोल व भाग चे वजन वेगवेगळे असते. हे म्हणणे खरे आहे की, कापूस मोजतेवेळी त्या नोंदी मापारी घेत असतो व माझ्या प्रकरणात देखील तशा नोंदी घेण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्याची एक प्रत शेतक-याला दिली जाते व एक प्रत व्यापा-याला दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, काटा पट्टीवर कापूस मोजणारा, विकणारा व विकत घेणा-याची सही असते. मी ती प्रत पोलीसांना तपासाकामी दिलेली नाही. ती प्रत आजही माझ्याकडे उपलब्ध नाही. मी पोलीसांना तक्रार किती तारखेला दिली हे माझ्या

लक्षात नाही. ती तक्रार मी दसरखेड एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनला दिली होती. मी पोलीसांना सदर प्रकरणाची तक्रार दसरखेड पोलीस स्टेशनला दिल्याचे सांगितले होते. त्या छापील प्रथम खबरी अहवालाची प्रत मला दसरखेड पोलीस स्टेशनने दिली नव्हती. मी पोलीसांना बयाण देतेवेळी महादेव शामराव धाडे यांनी सुध्दा माल विकल्याचे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सदरची बाब मी आज न्यायालयात पहिल्यांदाच सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितल्याप्रमाणे आरोपी रमेश लाहुडकरला कोणताही कापूस विकलेला नाही, त्यामुळे त्याचे कोणतेही पैसे देणे लागत नाही. रमेश लाहुडकर व माझे शेतात चार ते पाच शेत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेतातून लाहुडकरच्या शेतात जाण्याकरिता रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याला माझ्या शेतातून जाण्याकरिता मी अडथळा करतो. हे म्हणणे खरे नाही की, रमेश लाहुडकर व माझ्यात शेतात जाण्याच्या रस्त्यावरून वाद असल्यामुळे खोटे बयाण देवून आजरोजी खोटी साक्ष दिली.

**उलटतपास पूर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....**

०८. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस. जगताप यांचेमार्फत सुरु....**

०९. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....**

१०. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....**

११. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.09.24 18:01:19 +0530

दिनांक : २४/०९/२०२५.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर